# जिल्हा परिषद, अहिल्यानगर
# पंचायत समिती, पारनेर
# ग्रामपंचायत कोहकडी ता.पारनेर, जि.अहिल्यानगर

---

## सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कोहकडी ,
## ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

ई-निविदांतर्गत Tender/(कोटेशन) निविदा सूचना-GPKohakadi/२०२५-२६

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कोहकडी ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे तर्फे, **कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद सा.बां. विभाग यांचेकडील** योग्य त्या वर्गातील ठेकेदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाचे रक्कम (work Portion) |
|---|---|---|
| १ | मौजे कोहकडी ता. पारनेर येथील टोणगे वस्ती येथे शेत पाणंद रस्ता करणे. | १७९३५९६/- |
| २ | मौजे कोहकडी ता. पारनेर येथील कानिकझे वस्ती ते निघोज रोड शेत पाणंद रस्ता करणे | १२८०८७७/- |
| ३ | मौजे कोहकडी ता. पारनेर येथील रतनेश्वर पालखी मार्ग शेत पाणंद रस्ता करणे | १७९३५९६/- |
| ४ | मौजे कोहकडी ता. पारनेर येथील सोसायटी ऑफीस ते देवाचा मळा शेत पाणंद रस्ता करणे | १७९८०८८/- |

**योजनेचे नाव - MGNREGA**

**१) सदर संपूर्ण दरपत्रक प्रक्रिया ई-निविदेद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणकीय अज्ञावालीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा, नोटीस प्रसिद्धी सूचना शुद्धीपत्रके इत्यादींची माहिती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.**

**२) वरील कामाच्या निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील.**

१) **सदर कामांच्या निविदेबाबत खालील बाबी आवश्यक राहतील.**

२) **ठेकेदारांनी २ लिफाफा पद्धतीने ई-निविदा सादर करणे गरजेचे आहे.**

३) **ठेकेदारांनी कामाचे नकाशे, निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय कामाचे स्थळ, मजूर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबींचा अभ्यास करूनच निविदा सादर कराव्यात.**

४) **लिफाफा मधील सर्व कागदपत्राची छाननी करून आपली निविदा तांत्रिक लिफाफ्यात पात्र झाल्यास आर्थिक लिफाफ्यात आपला दर विचारात घेतला जाईल.**

५) **कोणत्याही अटीवर आधारित असलेल्या ई-निविदा स्वीकारल्या अथवा मंजूर केल्या जाणार नाही.**

६) **सदर कामाचा राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करणेत येईल.**

**तांत्रिक लिफाफा खालीलप्रमाणे**

- **कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद सा.बां. विभाग यांचेकडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील.**
- **उद्यम, उद्योग आधार, शॉप ॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र असल्यास**
- **PAN CARD.**
- **GST प्रमाणपत्र.**
- **ITR return (३ year)**
- **बंधपत्र. (Rs ५०० Stamp) स्टॅप पेपर वर समोरील बाजूने मजकुर असावा.** शासन निर्णय क्रमांक सीएटी २०२२ प्र.क्र.५०/इमा/२ दिनांक ११/०५/२०२२ अन्वये कंत्राटदाराने इ निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र रु ५०० च्या स्टॅपपेपर वर लिफाफा क्र १ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. प्रतिज्ञापत्रावर कामाचे नाव हे टंकलिखित (Tender ID सहित) केलेले असावे प्रतिज्ञापत्र व कामाचे नाव एकाच फॉन्ट मध्ये असणे आवश्यक आहे हस्ताक्षरात लिहिलेले स्टॅप स्वीकारले जाणार नाही. निविदा मिळाल्यानंतर कार्यारंभ आदेश मिळणेपूर्वी निविदेला जोडलेला स्टॅपपेपर मूळ प्रत ग्रामपंचायत ला जमा करणे बंधनकारक आहे.

- कामाचे अनुभव प्रमाणपत्र उपअभियंता यांचे स्वाक्षरी चे (फक्त नवीन नोंदणीकृत कंत्राटदारांसाठी समान कामाचे अनुभवाचे दाखलेसाठीची अट सुरुवातीचे तीन वर्षापर्यंत शिथिल राहील मात्र नवीन नोंदणी असलेबाबत निविदाधारकांनी निविदा ऑनलाईन भरते वेळी स्वतचे रु १०० चे स्टॅपपेपर वर प्रतिज्ञापत्र (वर्क डन मधून सूट मिळणेबाबत) अपलोड करावे.

- अहिल्यानगर जिल्हा परिषद जा.क्र. स्टेनो/२२/२०२१ अहिल्यानगर दि.१५/०३/२०२१ नुसार कंत्राटदाराने इ निविदा सादर करताना वैधानिक लिफाफ्यामध्ये कागदपत्रे अपलोड करण्यापूर्वी स्वतः कागदपत्रांवर पान क्रमांक एकूण पाने (उदा. १/६७) अश्या पद्धतीने सर्व पाने क्रमांक टाकून पृष्ठांकित करून लिफाफा १ मधे अपलोड करावी. कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक नमुद नसल्यास सदरची निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही,

- ५० लक्ष वरील सर्व कामांसाठी विड कॅपीसीटी ची अट लागू राहील.
- Statement No 1,2,3,4
- कॉक्रीट रस्त्याच्या कामाकरिता मोबाईल कॉक्रीट मिक्सर / आरएमसी प्लांट/व्हायब्रेटर / ट्रीमिक्स मशीन स्वः मालकीचा किंवा भाडेतत्वावर असल्याचे करारनामा जोडणे आवश्यक राहील.
- काम मंजूर झाल्यास नियमानुसार स्टॅप ड्यूटी फी भरावी लागेल,
- निविदा मंजूर झाल्या नंतर मूळ स्टॅप अपलोड केलेले ग्रामपंचायत ला ३ दिवसाच्या आत जमा करावे लागतील. मूळ स्टॅप व सादर केलेल्या स्टॅप या मध्ये तफावत आढळून आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल
- निविदा उघडणेच्या कालावधीत बदल होऊ शकतो.
- गरज भासल्यास मुळ कागदपत्रे तपासणी साठी सादर करावी लागतील.
- सदरील कामाचा दर BOQ फाईल मध्ये सादर करावा.
- काम सुरू असताना कामगारांना काही हानी झाल्यास किवा काही अपघात झाल्यास सर्व जबाबदारी ही सदरील ठेकेदारची राहील व काम सुरू असताना कामगारांना सुरक्षा साहित्याचा पुरवठा करावा कामगारांच्या सुरक्षेबाबत हलगर्जी पणा केल्यास ग्रा प कडून सदरील ठेकेदारवर नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. (ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक दि ०५/१०/२०१८ अन्वये कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश घेतेवेळी कामगारंचा विमा हा विमा निधी संचालक मुंबई यांच्या मार्फत उत्तरवलेला असणे बंधनकारक राहील विमा पॉलीसी चलन/पावती जोडणे आवश्यक आहे नंतर त्या कामाचा आदेश दिला जाईल)
- ज्या निविदेच्या कामाचा सर्वात कमी दर असेल ती निविदा मंजूर करण्यात येईल.
- वरील निविदेस शासन नियमानुसार GST लागू राहील.
- GST बाबत
- १) शासन परिपत्रक वित्त विभाग क GST १०१७/प्रक्र..८१/करधान/१ दि१९ ऑगस्ट २०१७
- २) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक GST २०१७ /प्र क्र १५५ करधान-१ दि ११ सप्टेंबर २०१७अन्वये अटी व शर्ती लागू राहतील.
- ३)Government Of Maharashtra Public Work Depatrment Govt. Circular No Sankirna 2017/C.R 121(part-2) Building-2 Date 19th September 2017 ४) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२१/ (भाग-२)/इमारती-२ दि.२७/०९/२०२२
- अन्वये अटी व शर्ती लागू राहतील.
- कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर प्रस्तावित कामाच्या ठिकाणचे फोटो (काम सुरु करणे पूर्वीचे ५ फोटो) व रेखांकन प्रमाणपत्र व पाहिला हप्ता मागणीचे पत्र पंचायत समिती कार्यालयास सादर करणे जेणेकरून ग्रामपंचायत ला पहिला हप्ता वर्ग करता येईल, रेखांकन केल्याशिवाय कामे सुरु करू नये.
- आवश्यक किंवा उपलब्द असणारी मशीनरीचे प्रमाणपत्र सोबत जोडावी.
- निधीच्या उपलब्धतेनुसार बिल अदा केले जाईल.
- कामाच्या प्रगतीच्या विविध टप्प्याची दिनांक तारीख यांचेसहित डीजीटल छायाचित्र (कामाच्या सर्व बाजू दर्शवणारे किमान ५ फोटो) कामाचे सुरुवातीपासून शेवटपर्यंत सादर करणे गरजेचे आहे.

- वरील प्रमाणे मागणी केलेले सर्व कागदपत्र हे जोडणे अनिवार्य आहे अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.
- निविदा प्रपत्रातील व नोटीसी मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील
- कामाची मुदत ३६५ दिवस राहील व काम मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदार यांची राहील,
- निविदा धारकाने १०% पेक्षा कमी दराची निविदा भरल्यास तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे उदा. १०% पर्यंत १% व २५-१०-१५% असे एकूण १६% एवढ्या रकमेचा एकत्रित धनादेश निविदेसोबत सदर करावा लागेल. तसेच १०% पर्यंत कमी असेल तर १% रक्कम एवढा धनादेश (DD) सादर करणे अनिवार्य राहील सदर
- अंदाजपत्रक दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास शासन परिपत्रक क्र सी.ए.टी./२०१७/प्र.क्र.०८/ इमा२/मंत्रालय मुंबई ४०००३२ दि २६/११/२०१८ अन्वये प्राप्त. निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांच्या असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन टक्के १ विशेष सुरक्षा ठेव व १५% पर्यंत कमी दरापर्यंत (१४% १०% =५%) व १५ ते १९% कमी दरासाठी (१९% १५% ४) ४% करिता (४०२-८) ८% असे एकूण (१+५+८)-१४% एवड्या रकमेची बँक ग्यारंटी किवा डीडी ग्रामपंचायत कोहकडी  यांचे नावे विशेस सुरक्षा ठेव म्हणून काढणेत यावा.
- मागणी धनाकर्ष हा ग्रामपंचायत कोहकडी  या नावाने असावा. १% पेक्षा कमी LI निविदाधारकाने आपल्या जबाबदारीने निविदा उघडलेच्या नंतर ८ दिवसाच्या आत डीडी ग्रा प कार्यालयात जमा करावा त्या संबंधी कोणताही पत्र व्यवहार तसेच संपर्क प्राप करणार नाही याची नोंद घ्यावी. डीडी
- सरकारी किंवा शेड्यूल बँकाकडून काढालेला असावा, डीडी वरती बँकचे IFSC No व MICR Code नंबर असणे आवशक आहे. काम मंजूर होताच ८ दिवसाच्या आतील DD असावा.
- बँक गॅरंटी कीवा डीडी सीलबंद लिफाफ्या मधून कंत्राटदारानी निविदा उघडलेच्या दिनांकापासून ८ दिवसाच्या आत ग्रामपंचायत कोहकडी  यांच्या कार्यालयात उपलब्ध करून देणे/जमा करावा. विहित मुदतीत बँक गॅरंटी किवा डीडी जमा होणार नाही अथवा चुकीचा बँक गॅरंटी किवा डीडी जमा केल्यास केल्यास सदर कामाचा कार्यारंभ आदेश रद्द करण्यात येईल व L२ निविदाधारकास लेखी विचारणा करून L१ च्या दराने काम करण्यास तयार असल्यास L१ ला कोणतेही कारण न कळवता L२ यांना कार्यारंभ आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि ५ दिवसाची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथिल असणार नाही
- लिफाफ्या वर कामाचे नाव, निविदा सूचना क्रमांक ठेकेदाराचे नाव नाव पूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक लिहिण्यात यावे
- निविदाधारकाने १०% टक्के किंवा त्यापेक्षा जास्त कमी दराने निविदा भरल्यास इतक्या कमी दराने कामाचा दर्जा योग्य राखून काम कसे पूर्ण करणार याबाबत सविस्तर लेखी खुलासा स्वाक्षरी सह करावा कार्यालयास अन्यथा निविदा अवैध समजण्यात येईल कमी दराची निविदा भरल्यास उपरोक्त प्रमाणे पूर्तता न केल्यास निविदा अपात्र करण्यात येईल
- निविदा उघडनेचा मेसेज प्रणाली मार्फत इमेल द्वारे व मेसेज कळविला जातो लिफाफा क्र २ उघडल्यानंतर लघुत्तम निविदाधारकाने आवशक त्या कागदपत्राची पूर्तता करणे कामी तात्काळ कार्यालयास संपर्क साधून ५ दिवसाचे आत करारनामा करणे आवशक राहील याबाबत

कार्यालयाकडून कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यानंतर निविदे बाबत कार्यालास घेईल तो निर्णय निविदाधारकावर बंधनकारक राहील.

- शासन परिपत्रक क्र २०१८/ प्रक्र १९८/बांघ४/दि १२/१०/२०१८ नुसार कंत्राटदारानी कामगारांची कामगार कल्याणकरी मंडळ कडे नोंद केलीली असणे बंधनकारक राहील
- मालाची ROYALTY वेळोवेळी शासनास भरून पावत्या कार्यालयाकडे सादर करण बंधनकारक राहील
- नियमानुसार शासकीय कपाती केल्या जातील,
- वरील पद्धती मध्ये खोटी कागदपत्रे धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित ठेकेदाराची नोंदणी १ वर्षासाठी स्थगित ठेवण्यात यावी यासाठी शासन नियमाप्रमाणे प्रस्ताव पाठविण्यात येईल
- तांत्रिक तक्त्यामध्ये शासन निर्णय क्र सीएटी/२०१७/प्र क्र ०८/ इमा/२ दि १२/०४/२०१८ अन्वये खोटी कागद पत्रे सादर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत कंत्राटदाराची बयाना रक्कम जप्त करून नोंदणी निलंबित करण्यात येईल, काळ्या यादीत टाकणे यासारखी कारवाई करण्यात येईल.
- भाववाढ फरक सदर कामांना लागू असणार नाही
- निविदेतील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या ठेकेदाराची निविदा किवा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र ठरवण्यात येतील
- सदर च्या निविदा नोटीसमधील अटी व शर्ती शिवाय इतर आवशक त्या अटी व शर्तीचा समावेश प्रत्यक्ष करारनामा करावा लागेल
- सदर कामाचा निधी कालमर्यादित असल्यामुळे काम विहित वेळेतच पूर्ण करावयाचे आहे अन्यथा झालेल्या विलंबास जबाबदार धरून दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
- सदर कामाची १ वर्षे देखभाल व दुरुस्ती करणे अनिवार्य आहे. तसेच दोषदाईत्व कालावधी व कामातील सर्व त्रुटी दूर करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील व कामाचे टप्पानिहाय समांतर मूल्यमापन सक्षम व प्राधिकृत यंत्रणेमार्फत करणेत येईल आणि त्या प्रमाणानुसार झालेल्या कामाचे देयक अदा केले जाईल
- निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यातील वेळोवेळी मागणी करण्यात आलेल्या कागदपत्रापैकी कोणतेही कागदपत्र ऑनलाईन अपलोड न केल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही
- ई-निविदेसोबत असलेल्या BOQ फाइलमध्ये निविदा सादरकर्त्यांचे नाव व दर दिलेल्या ठिकाणी सादर करून अपलोड करावेत.
- निविदाधारकांनी सादर केलेले दर हे निविदा उघडण्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत स्विकृतीस पात्र राहतील आणि कामाचा पूर्ण करणेच कालावधी हा 365 दिवस असा असा राहील.
- वरील अटी शर्तीबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्याबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही याबाबत सरपंच ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कोहकडी ता - पारनेर जि अहिल्यानगर यांचा निर्णय अंतिम राहील.
- कोणतेही कारण न देता निविदा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत सरपंच ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कोहकडी यांनी राखून ठेवला आहे. याची नांद घ्यावी

## निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | ब१– निविदा प्रसिद्धी ठिकाण | https://mahatenders.gov.in |
| २. | ब१– निविदा प्रसिद्धी दिनांक | As per Mahatenders |
| ३. | ब१– निविदा विक्री कालावधी | |
| ४. | ब१– निविदा सादर करण्याचा कालावधी | |
| ५. | ब१– निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | |
| ६. | ब१– निविदा उघडण्याचे ठिकाण | ग्रामपंचायत कोहकडी ता. पारनेर, जि. अहिल्यानगर |

Signature Not Verified
Digitally signed by SARALA SARJERAO MAHADIK
Date: 2026.05.18 16:05:17 IST
Location: Maharashtra-MH